# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२७ | शुक्रवार, १३ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA™
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### राज्यात उष्णतेची लाट नाही पण अस्मानी संकट

**पुणे, ता. १२ :** महाराष्ट्रात सध्या उन्हाळ्याचा जोर वाढला असून, बहुतांश भागात उष्ण आणि कोरडे हवामान आहे. तर किनारी भागात उष्ण आणि दमट स्थिती कायम आहे, तर काही भागांत उष्णतेची लाट आहे. पुढील २ दिवसांत पावसाची शक्यता कमी आहे, पण १३-१४ मार्चपासून मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. कोकणातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत उष्ण आणि दमट हवामान कायम आहे. आज कमाल तापमान ३१-३५ अंश सेल्सिअसपर्यंत राहील. १२ मार्चला हवामान कोरडे राहणार असून पावसाची शक्यता नाही. उष्णतेच्या लाटेची स्थिती काही ठिकाणी कायम राहू शकते. मध्य महाराष्ट्रातील पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगरमध्ये तापमानात मोठी वाढ झाली आहे. आज मुख्यत: उष्ण आणि कोरडे हवामान राहील. कमाल तापमानाचा पारा ३३ ते ३८ अंशांपर्यंत जाईल. आज पावसाची शक्यता नसली तरी १३-१४ मार्चला तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे.

# धरण उशाला कोरडा घशाला; विजेअभावी शेतकरी त्रस्त

## पूर्व हवेलीत विजेच्या लपंडावामुळे शेकडो हेक्टर पिकेधोक्यात

**उरुळी कांचन, ता. १२ :** पूर्व हवेलीसाठी वरदान ठरलेला मुळा मुठा कालवा शेतकऱ्यांच्या बांधाच्या शेजारून दुथडी भरून वाहतोय. मात्र विजेअभावी हातातोंडाशी आलेली पिके सुकून जाण्याच्या मार्गावर आहेत. हे चित्र पूर्व हवेलीतील वळती, शिंदवणे, आष्टापूरसह परिसरातील आहे.

परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने पूर्व हवेलीतील कोरेगाव मूळ, उरुळी कांचन, सोरतापवाडी, शिंदवणे, व परिसरातील शेतकरी हैराण झाले आहेत. विजेअभावी शेतातील पिकांना पाणी देता येत नसल्याने कडक उन्हामुळे शेतातील पिके सुकू लागली आहे. त्यामुळे नर्सरी उद्योगासह शेतीचे अतोनात नुकसान या खंडीत प्रवाहाने होत असून व्यावसायिक ग्राहकाचे मोठे नुकसान अटळ असून योग्य दाबाने सुरळीत




वीज पुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी करू लागले आहेत.

दोन आठवड्यांपासून ३५ वर पोहोचलेला पारा, उन्हाच्या दाहकतेने भेगाळणाऱ्या जमिनी, महावितरणचा आठ तास वीजपुरवठा मात्र त्यातही २ ते ३ तासाचे लोडशेडिंग यामुळे पुरेशी जमीन भिजत नसल्याने करपत चाललेली पिके ही भयाण वास्तवता सध्या शिवारात आहे. वाढत्या उन्हासह महावितरणच्या दुजाभावामुळे कालवा व नदीकाठच्या गावांतील पिके, जनावरे व शेतकरी होरपळून निघत आहेत.

शेतीपंपांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असून, पंप नादुरुस्त होत आहेत. वीज वितरण कँम्नी मात्र खंडित वीजपुरवठ्याबाबत मौन बाळगून आहे. कुठलीही सकारात्मक कार्यवाही याबाबत केली जात नाही. दिवसा फक्त सहा ते साडेतास वीज शेतीपंपांना मिळत असून सर्वच भागांत शेतीपंपांना अनियमित वीजपुरवठा केला जात आहे. त्यामुळे ग्रामस्थ व शेतकरी वैतागले असून विजेच्या लपंडावामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

दरम्यान, ऐन उन्हाळ्यात उन्हाच्या झळा सोसाव्या लागत असल्यामुळे पिके करपू लागली आहेत. भारनियमन, दुरुस्तीच्या कामामुळे वीजप्रवाह वारंवार खंडित होण्याचे प्रमाण आणि बाकी इतर कारणांमुळे कायमच वीजपुरवठा बंद असतो. त्यामुळे भारनियमनाच्या संकटाबरोबर इतर दुरुस्तीच्या संकटांशी शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. यात शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत असून, वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून वीजप्रवाह सुरळीत करावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी करू लागले आहेत.

वीजपुरवठा यंत्रणेत अनेक रोहित्रे नादुरुस्त, तर काही कायमस्वरूपी बंद असल्याचे आढळले. वीजतारांची अवस्थाही भीषण आहे. बऱ्याच जागी या तारा लोंबकळत असून, एकमेकांना चीटकत आहेत. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. मात्र कर्मचाऱ्यांणा याबाबतची माहिती दिल्यास त्यांच्या दुरुस्तीची तसदी वीज कंपनी घेत नाही. परिणामी अनेकदा तक्रार करूनही वीजपुरवठ्याची परिस्थिती जैसे थे आहे. वीज कंपनीचे कर्मचारी, अधिकारी तांत्रिक काम हाती घेऊन वीजपुरवठा बंद करतात. व शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीला केराची टोपली दाखवतात. असा आरोपहि काही शेतकऱ्यांनी केला आहे. पूर्व हवेली तालुक्यातील उरुळी कांचन उपविभागातील वळती उपकेंद्रावरील वाहिनीवर वीजेची अतिरिक्त मागणी कडक उन्हाळी वातावरणाने वाढल्याने वीज वाहिनी खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे.

या वाहिनीवर थेऊर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, तरडे ,वळती व उरुळी कांचन या वाढत्या नागरीकरणासह शेती, नर्सरी उद्योग व व्यावसायिक वीजेची मागणी असताना वीजेचा पुरवठा उन्हाळ्याच्या झळांनी अतिरिक्त वीजेच्या मागणीमुळे खंडीत होत असल्याने उन्हाळ्याची चाहूल लागताच नागरीक संतप्त झाले आहेत.

> उरुळी कांचन महावितरण कंपनीच्या उपकार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत निवेदन निवेदन देऊन समस्या सांगितल्या. यावेळी आजपासून नवीन वेळेनुसार वीज देण्यात आली. मात्र अर्ध्या तासानंतर पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाली. याबाबत कर्मचाऱ्यांना वीजपुरवठा खंडित झाला याबाबत माहिती विचारले असता लोड आला त्यामुळे लाईट बंद केली अशी उत्तरे मिळतात. मग लोड येतोय तर तुम्ही अधिकारी व कर्मचारी यांनी याबाबत नियोजन करणे गरजेचे आहे. तुम्हाला सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी या ठिकाणी पोस्टिंग केली. त्याचे नियोजन तुम्ही करून शेतकऱ्यांना ठरलेल्या वेळेत वीज द्या व शेतकऱ्यांच्या समस्या सोडवा .
> - **गुरुनाथ मचाले,** शेतकरी, शिंदवणे, ता. हवेली

> मागील दोन ते तीन दिवसांपासून लाईटची समस्या झाली होती. विजेची समस्या तात्काळ मार्गाला लावून नवीन तारा तसेच नवीन पोल टाकण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे या पुढील काळात लाईटच्या समस्या जास्त उद्भवणार नाहीत.
> - **महेश धाडवे,** उपकार्यकारी अभियंता, महावितरण, उरुळी कांचन (ता. हवेली)

# गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना रंगेहात पकडले

**लोणी काळभोर, ता. १२ :** संशयास्पद हालचाल करत बँकेच्या भिंतीच्या आडोशाला लपून बसलेल्या दोन तरुणांना पोलिसांनी गस्तीदरम्यान पकडल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गुजरवस्ती परिसरातील माढेश्वरी बँकेच्या परिसरात मंगळवारी (ता.१०) मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास केली आहे. संभाव्य गुन्ह्याच्या तयारीत असतानाच, लोणी काळभोर पोलिसांनी वेळीच कारवाई केल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

संकेत किरण घोरपडे (वय २२, रा. पेटकरवस्ती, कुंजीरवाडी) आणि राज लक्ष्मण कांबळे (वय २२, रा. कवडीपाट टोलनाका परिसर) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार




सूरज किरण कुंभार यांनी सरकारतर्फे लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पथक सराईत गुन्हेगार तसेच पाहिजे असलेल्या आरोपींच्या तपासासाठी गस्त घालत होते. या पथकात पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे तसेच पोलीस कर्मचारी अशोक भागवत गिरी यांचा समावेश होता. गस्त घालत असताना पोलसीयांना ११ मार्च रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास गुजरवस्ती परिसरातील माढेश्वरी अर्बन डेव्हलपमेंट को. ऑप. बँक परिसरात अंधारात दोन इसम भिंतीच्या आडोशाला संशयास्पदरीत्या लपून बसलेले दिसले.

पोलिसांनी वाहनाचे हेडलाईट टाकून पाहणी केली असता दोघेही आपले अस्तित्व लपवून बसल्याचे लक्षात आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांना पकडून त्यांची चौकशी केली. या ठिकाणी येण्याचे कारण विचारले असता दोघांनीही उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे दिली. संशय अधिक बळावल्याने लोणी काळभोर पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेऊन लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आणले. प्राथमिक चौकशीत हे दोघे दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने अंधारात लपून बसले असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी दोन्ही तरुणांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अंतर्गत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या सतर्क गस्तीमुळे संभाव्य गुन्हा वेळेत उधळला गेला असून परिसरात पोलिसांची गस्त अधिक कडक करण्यात वेळ आली आहे.

# लोणी काळभोर येथील रामदरा डोंगराला आग ; शेकडोंची वनसंपदा जळून खाक

**लोणी काळभोर, ता. १२ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील तीर्थक्षेत्र रामदरा परिसरातील डोंगरावर लागलेल्या भीषण वनव्या मुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी झाली असून लाखो झाडांसह असंख्य कीटक, सरपटणारे प्राणी आणि पशुपक्ष्यांना याचा मोठा फटका बसल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या आगीत अनेक दुर्मिळ वनस्पती आणि वन्यजीवांचे अधिवासही नष्ट झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रामदरा परिसरातील वनविभागाच्या हद्दीतील डोंगरावर काल दुपारच्या सुमारास अचानक आग लागली. सुरुवातीला लहान असलेली आग वाऱ्याच्या जोरामुळे काही वेळातच भीषण रूप धारण करत संपूर्ण डोंगर परिसरात पसरली. वनव्यामुळे खैर, करवंद, कडुनिंब, चंदन, टंटणी तसेच विविध प्रजातींच्या बाभळींसह अनेक झाडे जळून खाक झाली.

वनव्याची माहिती मिळताच ग्रीन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित जगताप आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोती आणि झाडांच्या फांद्यांच्या सहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीला वाऱ्याची साथ मिळाल्याने ती वेगाने पसरत गेली आणि कार्यकर्त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले.

या आगीत परिसरात आढळणारे मोर, ससे, हरीण, कोल्हे, लांडगे, तरस, सायाळ, मुंगूस, रानडुक्कर, साप तसेच असंख्य छोटे कीटक आणि सरपटणारे प्राणी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगितले जात आहे. अनेक पक्ष्यांची अंडी आणि प्राण्यांची पिल्लेही या आगीत



नष्ट झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, ग्रीन फाउंडेशनच्या वतीने झाडांना पाणी देण्यासाठी टाकण्यात आलेली पाइपलाइनही या आगीत जळून खाक झाली आहे. त्यामुळे परिसरातील वृक्षसंवर्धनाचे कामही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहे. वनवा नेमका लागला की कोणीतरी जाणूनबुजून लावला, याबाबत अद्याप स्पष्टता नसून याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरवर्षी उन्हाळ्यात या डोंगरांना वनवे लागतात आणि त्यात पक्षी-प्राण्यांचे बळी जातात, असे सांगत ग्रीन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित जगताप यांनी यामागील कारणांचा सखोल तपास करण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, घटनास्थळी ग्रीन फाउंडेशनचे कार्यकर्ते आगीशी झुंज देताना दिसत होते, मात्र वनविभागाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी तेथे दिसून आला नसल्याचे स्थानिकांनी सांगितले. वनविभागाकडून झाडे लावण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो, मात्र मोठी झाडे जळत असताना त्यांना वाचवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना दिसून येत नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

# पंतप्रधान स्वत: घाबरलेत, सभागृहात येऊ शकत नाहीत : राहुल गांधींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली, ता. १२ :** काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी यांनी, ते स्वतः विविध कारणांमुळे घाबरले आहेत. असे म्हणत तयांचयावर टीका केली.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी त्यांनी ही टीका केली. यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी, पंतप्रधान घाबरण्याची गरज नाही असे म्हणत आहेत, परंतु ते स्वतः पूर्णपणे वेगळ्या कारणांमुळे घाबरले आहेत. अदानी प्रकरण आणि एपस्टाईनमुळे ते घाबरले आहेत. ते सभागृहात प्रवेश करू शकत नाहीत.असे म्हणत त्यांनी त्यांच्यावर हल्लाबोल केला.

तत्पूर्वी, ज्येष्ठ काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटले होते की, विरोधी पक्ष



पश्चिम आशियातील परिस्थिती आणि त्याचा भारतावर होणाऱ्या परिणामांवर संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा करण्याची मागणी करत आहेत. परंतु मोदी सरकार अशा चर्चेला परवानगी देण्यास हट्टीपणे नकार देत आहे. सरकार स्पष्टपणे घाबरलेले दिसते. त्यांचे परराष्ट्र धोरण आधीच गंभीरपणे उघड झाले आहे.

**एलपीजी टंचाईवरून विरोधी पक्षांचे निषेध**

गुरुवारी, देशाच्या विविध भागांमध्ये एलपीजी टंचाईवरून काँग्रेस आणि इतर पक्षांनी पुन्हा एकदा संसद संकुलात निषेध केला. काँग्रेस, समाजवादी पक्ष, द्रमुक आणि इतर अनेक विरोधी पक्षांचे खासदार संसदेच्या मकर गेटजवळ जमले आणि त्यांनी सरकारविरुद्ध घोषणाबाजी केली.

त्यांनी मोदी जी एलपीजी! असे घोषणा दिल्या. विरोधी पक्षाच्या खासदारांनी गॅस सिलिंडरसारखे आकाराचे फलकही हातात घेतले होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी देखील या निषेधात सामील झाले.

# भूसंपादनासाठी निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पिंपरी-चिंचवड, ता. १२ :** पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये सुरू असलेल्या रस्तेविकास आणि इतर प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी गती देण्यात येईल. आवश्यक निधी महापालिका आणि राज्य शासन दोन्हीकडून उपलब्ध करून दिला जाईल. कालबद्ध नियोजनासाठी लवकरच आढावा बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुणे मेट्रोपोलिटन रिजन मधील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी आज विधानसभेत जोरदार चर्चा झाली. आमदार महेश लांडगे यांनी पुणेनाशिक महामार्गावर



होणाऱ्या वाहतूक कोंडी आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सकारात्मक प्रतिसाद दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, पुणेनाशिक महामार्ग (एन एच -६०) नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची आवश्यकता आहे. नाशिक फाटा ते खेड दरम्यान प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर व जोड रस्ते प्रकल्प लवकरच सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच,संपूर्ण पीएमआर क्षेत्रात वाहतूक व्यवस्थापनासाठी सिंगल पॉईंट अथॉरिटी आवश्यक आहे. एम आयडीसी रस्त्यांचे आधुनिकीकरण करुन औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक सुलभ करण्यासाठी विशेष पुढाकर घेण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे महानगर प्रदेशात मेट्रो नेटवर्क वाढवावा, अशी मागणी सभागृहात केली.

तसेच, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या महामार्गासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉरची घोषणा केली आहे, मात्र १०० टक्के भूसंपादन न झाल्यामुळे रुंदीकरणाचे काम सुरू करता येत नाही. त्यासाठी कालबद्ध नियोजन करून भूसंपादन लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. देवाभाऊंच्या नेतृत्त्वाखाली पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले गेले आहेत आणि आगामी काळात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या या परिसरात विकासाचे रोल मॉडेल तयार होईल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी भूसंपादन निधी लवकरात लवकर उपलब्ध करण्यात येईल. काही निधी महापालिका उपलब्ध करेल. त्यांच्या माध्यमातून भूसंपादन होईल. तसेच, पीएमआरडीए आणि राज्य सरकार अशा पातळीवरही निधी उपलब्ध करून देण्यासाठी आढावा बैठक घेण्यात येईल.
> - **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

जनमानसाचा निडर आवाज... पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# हार्दिक पांड्याविरोधात पुण्यातील वकिलाकडून तक्रार दाखल

**पुणे, ता. १२ :** न्यझीलंडला अंतिम सामन्यात पराभवाची धूळ चारल्यानंतर टीम इंडियाच्या खेळाडूंनी मैदानावर जंगी सेलिब्रेशन केले. टीम इंडियातील एका अष्टपैलू खेळाडूने आनंद साजरा करताना मैदानावरच केलेल्या एका कृत्यामुळे त्याच्यावर बरीच टीका झाली. यानंतर आता थेट पुण्यातील एका वकिलाने त्याच्याविरोधात एफआर दाखल केला आहे.



हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून भारतीय संघातील अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आहे. गर्लफ्रेंड महिकासोबत मैदानातील बक्षीस वितरणासाठी उभारण्यात आलेल्या स्टेजवर हार्दिक पांड्या झोपला होता. दोघांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायर झाला. त्यानंतर दोघांवर संताप व्यक्त करत हार्दिकच्या वर्तनावर टीका करण्यात आली. सदर प्रकरण त्याला भोवले असून पुण्यातील वकील वाजिद खान यांनी त्याच्याविरोधात शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. टी २० विश्वचषक भारतीने जिंकल्यानंतर देशभरात जल्लोष साजरा करण्यात आला. टीम इंडियातील खेळाडूंचा आनंद गगणात मावेनासा झाला. त्यांनी मैदानावर जंगी सेलिब्रेशन केले. दुसरीकडे हार्दिक पांड्या आणि त्याची गर्लफ्रेंड महिका शर्मा मैदानावर फिरत होते, नाचत होते. महिकाने यावेळी हार्दिक पांड्याला अनेकदा मिठी मारली. त्याच्या गालावर किसही केले.

त्यानंतर दोघांचे व्हिडिओ सोश मीडियावर व्हायरल झाले. त्यांनी केलेल्या वर्तनावर नेटकऱ्यांनी कडाकडून टीका केली. हार्दिकने मैदानावर केलेले कृत्य अनेकांना खटकलं. चाहत्यांनी मोठ्या प्रमाणावर हार्दिकला ट्रोल केले.

हार्दिक पांड्याने भारतीय ध्वजात गुंडाळून महिका शर्मासोबत सेलिब्रेशन केले. हे करताना त्याने नाच केला. नंतर तो झोपला, ज्यामुळे भारतीय ध्वजाचा अपमान झाला, असा दावा वकील वाजिद खान यांनी केला आहे.

# यशवंतराव चव्हाणांच्या जयंतीदिनी सुनेत्रा पवारांसह मान्यवरांचे समाधीला अभिवादन

**कराड, ता. १२ :** माजी उपमुख्यमंत्री (कै.) अजित पवारांच्या प्रेरणास्थळी यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीला जयंतीदिनी अभिवादनाची परंपरा सुनेत्रा पवार यांनी जपली. सुनेत्रा पवार यांनी आज गुरुवारी सकाळी साडेआठच्या उपस्थितीचा कटाक्ष पाळत सहकाऱ्यांसमवेत उपस्थित राहत, त्या यशवंतरावांच्या स्मृतीस्थळी नतमस्तक झाल्या.



माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीदिनी सुनेत्रा पवार यांच्यासह राज्याचे माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सारंग पाटील, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, विक्रमबाबा पाटणकर, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, कराडचे उपनगराध्यक्ष प्रताप साळुंखे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर आदींनी यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह यशवंतप्रेमींची या वेळी मोठी उपस्थिती होती. दरम्यान, समाधी परिसरात शाळकरी मुली व शिक्षिकांनी सुनेत्रा पवार यांच्याशी नमस्ते, नमस्ते अशी हाक हस्तांदोलनाचा प्रयत्न केला असता, पवारांनीही त्यास प्रतिसाद दिला. त्यामुळे या शाळकरी मुली हरकल्या आणि भावनिक क्षण टिपण्यासाठी माध्यमांचे कॅमेरेही गर्दी करून राहिले. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त समाधी परिसरातील हिरवळीवर शब्द सुरांची भावपूर्ण आदरांजली या कार्यक्रमा द्वारे स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या विचार अन् कार्याला संगीतातून उजाळा देण्यात आला. या विशेष कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व मान्यवरांनी उपस्थिती लावली.

महाराष्ट्राचे श्रध्दास्थान असलेले यशवंतराव चव्हाण यांचे समाधीस्थळ हे अजितदादांचे शक्तिस्थळ, स्फुर्तीस्थान होते. चव्हाणसाहेबांच्या विचारांवर त्यांची वाटचाल राहिली होती. मी सुद्धा याच पद्धतीने वाटचाल करण्याचा सर्वांना शब्द देते अशी ग्वाही सुनेत्रा पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. आज माझं मन भरून येतयं अशा भावन्याही त्यांनी व्यक्त करत अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवार हे यशवंतराव चव्हाण यांचे विचारांवर वाटचाल करत होते. मी सुध्दा ही वाटचाल कायम ठेवणार आहे.

उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर दोन फेब्रुवारीला कर्तव्यनिष्ठ म्हणून मी इथे चव्हाणसाहेबांच्या समाधीला अभिवादन करून, नवी राजकीय वाटचाल सुरु करण्यासाठी आल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### नांदेड सिटीत पिस्तुलातून गोळी झाडून तरुणाची आत्महत्या



**पुणे, ता. १२ :** नांदेड सिटीत एका तरुणाने पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली.पार्थ बापू गोरे (रा. आसावरी इमारत, नांदेड सिटी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक गणेश कसबे यांनी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्थचे मामा हे नांदेड सिटीत राहायला आहेत. तो मामांकडे राहायला होता. नांदेड सिटीतील आसावरी इमारतीतील एका सदनिकेत तरुणाने गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती मंगळवारी ( मार्च) पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पार्थने कानाच्या मागे पिस्तूल लावून गोळी झाडून आत्म हत्या केल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे. पार्थने आत्महत्या का केली? याबाबत माहिती मिळू शकली नाही. त्याच्या कुटुंबीयांकडे चौकशी करण्यात येत आहे. पोलिसांनी घटनास्थळावरुन देशी बनावटीचे पिस्तूल जप्त केले आहे. बेकायाद बाळगलेले पिस्तूल त्याने कोणाकडून आणले, यादृष्टीने तपास करण्यात येत असल्याची माहिती नांदेड सिटी पोलिसांनी दिली.

# शेतीमालाच्या दरातील चढ–उतार रोखण्यासाठी स्वतंत्र शेतीमाल मंत्रालय स्थापन करा

## आमदार राहुल कुल यांची अधिवेशनात मागणी

**दौंड, ता. १२ :** निसर्गाच्या लहरीपणामुळे पिचलेल्या शेतकऱ्याला आता बाजारभावाच्या अनिश्चिततेतून बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र शेतीमाल मंत्रालय स्थापन करावे, अशी आग्रही आणि दूरगामी मागणी आमदार राहुल कुल यांनी केली आहे. शेतीला केवळ उदरनिर्वाहाचे साधन न मानता तिला 'उद्योगाचा' दर्जा मिळावा आणि शेतकऱ्याला त्याच्या घामाचा योग्य दाम मिळण्याची कायदेशीर खात्री मिळावी, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

आमदार राहुल कुल यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, महाराष्ट्रातील शेती सातत्याने नैसर्गिक आपत्तींचा सामना करत आहे. पण सर्वात मोठी शोकांतिका ही



आहे की, जेव्हा निसर्ग साथ देतो आणि पीक जोमाने येते, तेव्हा बाजारपेठेत भाव कोसळतात. उत्पादकता वाढली की शेतकऱ्याचे नुकसान होते, हे विसंगत चक्र थांबवण्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज आहे.

आमदार राहुल कुल या नवीन मंत्रालयाचे स्वरूप आणि कार्यपद्धती स्पष्ट करताना म्हणाले की, जेव्हा एखाद्या पिकाचे उत्पादन वाढते, तेव्हा त्याचे भाव पडू नयेत म्हणून हे मंत्रालय तातडीने निर्यात वाढवण्यासाठी किंवा स्थानिक प्रक्रिया उद्योगांना विशेष अनुदान देण्यासाठी शिफारस करेल. यामुळे अतिरिक्त मालाचा निचरा होऊन बाजारातील दर स्थिर राहतील, हे मंत्रालय केवळ शेतकऱ्यांसाठी नाही, तर ग्राहकांसाठीही असेल. टंचाईच्या काळात ग्राहकांना रास्त दरात माल मिळावा यासाठी आयातीचे नियोजन करणे आणि मुबलकतेच्या काळात शेतकऱ्याला संरक्षण देणे, असा समतोल हे मंत्रालय राखेल. शेतकऱ्याच्या एकूण गुंतवणुकीवर किमान ५० टक्के नफा मिळेल, अशा पद्धतीने आधारभूत किमतींचे आणि बाजारभावांचे धोरण हे मंत्रालय आखेल.

शेतकरी आत्मसन्मानाने जगू इच्छितो. पाणी आणि हवामानाची शाश्वती नसली, तरी शासनाने किमान 'भावाची शाश्वती'द्यावी. पुढील अधिवेशनापर्यंत या मंत्रालयाची अधिकृत घोषणा होऊन त्यासाठी स्वतंत्र बजेटची तरतूद करण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार राहुल कुल यांनी केली. या ऐतिहासिक मागणीमुळे कृषी क्षेत्रात मोठी क्रांती होऊ शकते, असा विश्वास राजकीय आणि कृषी वर्तुळातून व्यक्त केला जात आहे.

# बदनामी करण्याच्या धमकीमुळे तरुणीची आत्महत्या

**पुणे, ता. १२ :** भाडेतत्त्वावर सदनिका घेऊन एकत्र राहणाऱ्या मैत्रिणींनी बदनामी करण्याची धमकी दिल्याने तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना चंदननगर भागात घडली. तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन तीन तरुणींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पायल किशोर राजगुरु (वय-१९, रा. अरिहंत कॉम्प्लेक्स, महावीर सोसायटी, विठ्ठल नगर, मूळ रा. कासार अंबोली, ता. मुळशी) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. याबाबत पायलचे वडील किशोर राजगुरु यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तीन तरुणींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पायल राजगुरु ही परिचारिका अभ्यासक्रम करत होती. चंदननगर भागातील अरिहंत कॉम्प्लेक्समध्ये सदनिका भाडेतत्त्वावर घेऊन पायल आणि तीन मैत्रिणी राहत होत्या. आरोपी तरुणी खासगी ठिकाणी नोकरी करतात. सदनिकेतून काही दिवसांपूर्वी पैसे चोरीला गेले होते.त मोबाइल संच चोरीला गेला होता. आरोपी तरुणीने पायलवर चोरीचा आळ घेतला. बदनामी करण्याची धम की तिला देण्यात आली.

आरोपी तरुणींनी पायलच्या आई-वडिलांकडे तक्रार करण्याची धमकी दिली होती. त्यानंतर ९ मार्च रोजी पायलने सकाळी सातच्या सुमारास पंख्याला दोरी बांधून गळफास घेतला. त्या वेळी सदनिकेतील राहणारी एक तरुणी व्यायमाला गेली होती. सकाळी नऊच्या सुमारास ती सदनिकेत आली. तेव्हा तिने आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली.

# थेऊर येथे महिला पोलिसाच्या घरावरच चोरट्यांनी मारला डल्ला

**लोणी काळभोर, ता. १२ :** चोरट्यांनी थेट महिला पोलिस कर्मचाऱ्याच्या घरावरच हात साफ करून घरातील ५.८ तोळे सोन्याचे दागिने, रोकड चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना थेऊर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कांबळे वस्ती परिसरात बुधवारी (ता. ११) भरदिवसा घडली असून साडेतीन वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. पोलिसांच्या घरालाच चोरट्यांनी लक्ष्य केल्यामुळे लोणी काळभोर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याप्रकरणी पुंडलीक तानाजी थोरात (वय ३८, रा. कांबळे वस्ती, थेऊर रोड, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी थोरात यांच्या पत्नी अश्विनी पवार या लोणी काळभोर पोलिस ठाण्यात महिला पोलिस कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत.

११ मार्च रोजी सकाळी नेहमी प्रमाणे घरातील सर्वजण आपापल्या कामानिमित्त बाहेर गेले होते. मुलगी अनुजा (वय १०) सकाळी आठ वाजता शाळेसाठी घराबाहेर पडली, तर पत्नी अश्विनी पवार सकाळी दहा वाजता ड्युटीसाठी गेल्या. पुंडलीक थोरात हे सेकंड शिफ्ट असल्याने दुपारी १.४० वाजता नोकरीसाठी घराबाहेर पडले. घर सोडताना त्यांनी मुख्य दरवाजाला कुलूप लावून सर्व खिडक्या बंद केल्या होत्या.

दरम्यान, दुपारी साडेतीनच्या सुमारास मुलगी अनुजा शाळेतून परत आली असता घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडल्याचे तिच्या लक्षात आले. घाबरलेल्या अनुजाने खाली राहणाऱ्या भाडेकरू गौरी खोत यांना ही बाब सांगितली. त्यांनी लगेच पुंडलीक थोरात यांना फोनवरून माहिती दिली. या माहिती मिळताच, थोरात तातडीने कंपनीतून घरी परतले. घरात प्रवेश करताच लोखंडी कपाटाचे कुलूपही तोडलेले दिसले आणि घरातील कपडे व वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. कपाटातील लॉकर तपासला असता त्यातील रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. या चोरीत २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन टॉप्स, १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन झुमके, १० ग्रॅम वजनाची सोन्याची पुढारी अंगठी, ०२ ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे बदाम, ०६ भार वजनाचे पायातील चांदीचे पैंजण एकूण २ जोड, २ भार वजनाचे चांदीचे जोडवे असे ५.८ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व २५ हजारांची रोख रक्कम असा एकूण चालू बाजार भावाप्रमाणे सुमारे ९ लाखांहून अधिक रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे.

विशेष म्हणजे ही घटना दुपारी अवघ्या दोन तासांच्या कालावधीत घडली असून चोरट्यांनी निर्भीडपणे घराचे कुलूप तोडून चोरी केल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# प्लॉटच्या आमिषाने ५ लाखांची फसवणूक; तिघांविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा

**लोणी काळभोर, ता. १२ :** प्लॉट विक्रीच्या आमिषाने पाच लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून प्लॉट खरेदीच्या व्यवहारात नागरिकांनी अधिक सावध राहण्याची गरज निर्माण झाली आहे.



सतेश चंद्रशेखर पाषाणकर, राहुल लक्ष्मण सुतार व नितीन जगताप अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी काळूराम बाळासाहेब लवांडे (वय ३३, रा. शेवाळवाडी, पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२३ मध्ये लोणी काळभोर हद्दीतील गट नं. २/२, पाषाणकर बाग या ठिकाणी प्लॉटिंग करून विक्रीसाठी जाहिरातीचे फलक लावण्यात आले होते. त्या ठिकाणी एजंट म्हणून राहुल सुतार व नितीन जगताप हे प्लॉट विक्रीचे काम पाहत होते. १ फेब्रुवारी २०२३ रोजी फिर्यादी काळूराम लवांडे हे त्यांचे सहकारी ओंकार शेळके व गणेश शिंदे यांच्यासोबत प्लॉट पाहण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांना प्लॉट क्रमांक ४७ व ४० दाखवले. त्या प्लॉटची किंमत १४ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, ३ फेब्रुवारी २०२३ रोजी टोकन म्हणून लवांडे यांनी ३ लाख रुपये तर गणेश शिंदे यांनी २ लाख रुपये अशी एकूण ५ लाख रुपयांची रोख रक्कम आरोपींकडे दिली. त्यावेळी पावतीही देण्यात आली होती. मात्र त्यानंतर बराच काळ उलटूनही प्लॉटचे खरेदीखत करून देण्यात आले नाही. आरोपींकडे वारंवार पाठपुरावा करूनही टाळाटाळ करण्यात येत होती. अखेर २८ फेब्रुवारी २०२५ रोजी व्यवहार पूर्ण करण्यासाठी बोलावण्यात आले असता आरोपींनी पूर्वीच्या रकमेत प्लॉट देण्यास नकार देत सध्याच्या बाजारभावानुसार २० लाख रुपये द्यावे लागतील, अशी अट घातली.

फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पैसे परत मागितले असता, आरोपींनी पावत्या खोट्या असल्याचे सांगत अरेरावीची भाषा वापरून शिवीगाळ केली व पैसे देण्यास नकार दिला आहे. याप्रकरणी फिर्यादी काळूराम लवांडे यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सतेज पाषाणकर, राहुल सुतार व नितीन जगताप यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५२, ३५१(२), ३१८(४), ३१६(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भिगवणमध्ये रमजान ईद साधेपणाने; सामूहिक रोजा सोडण्याचा कार्यक्रम रद्द

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १२ : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या दुर्दैवी निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. या अपघातात अजितदादा पवार यांच्यासह एकूण पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून राज्यभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर भिगवण येथील मुस्लिम समाजाने संवेदनशीलता दाखवत यंदाची रमजान ईद अत्यंत साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी रमजान ईद निमित्त भिगवण मशीद परिसरात सामूहिक रोजा सोडण्याचा कार्यक्रम तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र राज्यभर पसरलेल्या शोकभावनेचा विचार करून यंदा उत्सवी वातावरण टाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> दिवंगत नेते अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मशीद ट्रस्टने यंदाचे सर्व उपक्रम रद्द केले आहेत. शहरातील राजकीय व सामाजिक वर्तुळातही अजून शोक व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सामूहिक रोजा सोडण्याचा कार्यक्रम व इतर उपक्रम आयोजित करणे योग्य नसल्याने हा निर्णय घेण्यात आला.
> - **जावेद शेख,** ग्रामस्थ, भिगवण



भिगवण मशीद ट्रस्ट व स्थानिक मुस्लिम समाजाच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे आयोजित केला जाणारा सामूहिक रोजा सोडण्याचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.

तसेच गावातील विविध सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांच्या वतीने होणारे इतर उपक्रम ही यंदा आयोजित करण्यात येणार नाहीत. समाजातील दुःखद प्रसंगात एकोपा आणि संवेदनशीलता जपण्याच्या भावनेतून हा निर्णय घेतल्याचे मुस्लिम बांधवांनी सांगितले.

# घरगुती, उद्योगांच्या वीजदरात पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने घट : मुख्यमंत्र्यांची घोषणा

**मुंबई, ता. १२ :** अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज दर अधिक असल्याची टीका होते. त्या पार्श्वभूमीवर घरगुती वापर आणि उद्योगांच्या वीजदरात कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बुधवारी केली. घरगुती वापरासाठी १०० युनिटपर्यंत पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने २६ टक्के दरात घट होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तरात फडणवीस यांनी राज्यात विजेचे दर अधिक असल्याचा चुकीचा आरोप करण्यात येत असल्याचा दावा केला. याउलट महायुती सरकारने विजेचे दर कमी करण्याला प्राधान्य दिले आहे. घरगुतीप्रमाणेच उद्योगांच्या वीज दरात टप्प्याटप्प्याने कपात होणार आहे. १०० युनिटपर्यंतच्या घरगुती वापराच्या ग्राहकांना पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने २६ टक्के दर कपात होईल. १०१ ते ३०० युनिटपर्यंत आणखी पाच टक्के सवलत मिळेल.


उद्योग तसेच औद्योगिक वापराच्या ग्राहकांच्या वीज दरात प्रति युनिट २ रुपये १७ पैसे सवलत दिली जाणार आहे. आतापर्यंत दरवर्षी घरगुती, औद्योगिक, व्यापारी वीज ग्राहकांच्या दरात सरासरी नऊ टक्के वीज बिलात वाढ होत असे. पण २०३० पर्यंत सर्व प्रकारच्या ग्राहकांच्या वीज बिलात सरासरी १.२ टक्के कपात होईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

विद्युत प्रणालीच्या बळकटीकरणासाठी सुमारे तीन लाख कोटींची खासगी गुंतवणूक झाली आहे. २०३५ पर्यंत राज्यात हरित किंवा अपारंपारिक उर्जेचे प्रमाण हे एकूण वापराच्या ६५ टक्के असेल. तसेच सौरउर्जा साठवणूक करण्याची प्रणाली तयार करण्यात आली आहे. राज्यातील एकूण ४६ लाख शेतीपंपधारकांपैकी ३३ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे. हे प्रमाण वाढविण्यात येणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

वाढता कर्जाचा बोजा, वित्तीय तूट, दरडोई उत्पन्नात राज्याची पिछाडी या मुद्द्यांवर विरोधकांनी चर्चेत चिंता व्यक्त केली होती. त्याचा उल्लेख करीत मुख्यमंत्र्यांनी राज्याची वित्तीय स्थिती उत्तम असल्याचा निर्वाळा दिला. देशाच्या लोकसंख्येत महाराष्ट्राचा वाटा हा साडेनऊ टक्के तर सकल राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा वाटा हा १४ टक्के आहे. विदेशी गुंतवणूक, निर्यात सज्जता, नवउद्योमी, ठेवी, वस्तू व सेवा कर अशा विविध प्रकारांमध्ये देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे असे फडणवीस म्हणाले.

कर्जाचा बोजा वाढला असला तरी राज्याची लोकसंख्या व आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कर्जाचे प्रमाण हे तुलनेत कमीच आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्क्यांच्या मर्यादेत कर्जाचे प्रमाण असावे, असे निकष आहेत. राज्यात हेच प्रमाण १८.५० टक्के आहे. महाराष्ट्रापेक्षा ओडिशा १३ टक्के तर गुजरात १५ टक्के ही दोनच राज्ये पुढे आहेत.

# साताऱ्यातील एका हायस्कूलमध्ये सहावीच्या विद्यार्थिनींनी तपासले दहावीचे पेपर?



**सातारा, ता. १२ :** विडणी गावातील उत्तरेश्वर हायस्कूल मध्ये एका शिक्षकाने दहावीच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी सहावीच्या विद्यार्थिनींची मदत घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वैभव शेंडे असे या शिक्षकाचे नाव असून ते दहावीच्या मराठी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम करत होते. मात्र उत्तरपत्रिका तपासत असताना त्यांनी सहावीच्या दोन विद्यार्थिनींकडून मदत घेतल्याचे समोर आले आहे. उत्तरपत्रिकांवरील गुणांकन आणि तपासणीसारखे संवेदनशील काम विद्यार्थ्यांकडून करून घेतल्याचा आरोप होत आहे. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर प्रकरणाची चर्चा सुरू झाली.

दहावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील महत्त्वाची टप्पा मानली जाते. त्यामुळे उत्तरपत्रिकांची तपासणी ही अत्यंत जबाबदारीची प्रक्रिया असते. अशा वेळी लहान विद्यार्थ्यांकडून उत्तरपत्रिका तपासून घेण्याचा आरोप गंभीर मानला जात आहे. या प्रकारामुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेवर आणि शाळांच्या शैक्षणिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, हा प्रकार उघड झाल्यानंतर शिक्षण विभागाकडून याची दखल घेण्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित शिक्षकावर काय कारवाई केली जाणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या प्रक्रियांमध्ये कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाबाबत शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी शिर्केयांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी दूरध्वनीवर प्रतिक्रिया देण्यास नकार देत या संदर्भात प्रत्यक्ष भेटून माहिती देऊ, असे सांगितले. त्यामुळे या घटनेमागील नेम केकारण आणि पुढील कारवाईबाबतची अधिकृत भूमिका काय असेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला थेऊर येथून अटक; अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी

## फॉच्युनर गाडीसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त



**लोणी काळभोर, ता. १२ :** अंमली पदार्थाचा साठा विक्री करीता जवळ बाळगणाऱ्या तस्करास अंमली पदार्थ विरोधी पथक १ व लोणी काळभोर पोलीसांनी बुधवारी (ता.११) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अटक केली आहे. त्याच्याकडून सुमारे ४० लाख ७० हजार २८० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रितम रविंद्र कुंजीर (वय-३२, रा. धुमाळ मळा, म्हसोबा मंदिराजवळ, थेऊर, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

अमली पदार्थ विरोधी पथक-१, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहीद पठाण व त्याचेकडील पोलीस अधिकारी व पथक असे पुणे शहर हद्दीत गस्त करीत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांना एका खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, एक इसम पांढऱ्या रंगाच्या फॉच्युनर गाडीमधून गांजाचा मोठा साठा विक्री करीता थेऊर परीसरात घेवून येणार आहे. अशी बातमी मिळाली होती. त्या अनुषंगाने अंमली विरोधी पथक-१ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी लोणी काळभोर पोलीसांच्या समवेत थेऊर फाटा परिसरात सापळा रचला.

तेव्हा प्रितम रविंद्र कुंजीर याला ताब्यात घेतले असता, त्याच्याजवळ १० लाख ६० हजार २८० रुपये किंमतीचा ५३ किलो १४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ तसेच ३० लाख रुपये किंमतीची फॉच्युनर गाडी व १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल असा एकूण ४० लाख ७० हजार २८० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथक, १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, पोलीस अंमलदार विठ्ठल साळुंखे, संजय राजे, रिहान पठाण, अमोल सरडे, निलेश जाधव, विजय कांबळे, मंगेश गुंड, विशाल भिलारे, राहुल शिंदे, अक्षय शिर्के व महिला पोलीस अंमलदार आशा भिंगारे, तसेच लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे, पोलीस हवालदार आण्णा माने, सुरज कुंभार व अशोक गिरी यांनी केली आहे.

# सोरतापवाडीत रुग्णवाहिकेला रस्ता देताना दुचाकीचा अपघात; दोघेजण जखमी




**उरुळी कांचन, ता. १२ :** पुणे - सोलापूर महामार्गावर रुग्णवाहिकेला रस्ता देताना झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील वजन काट्याच्या समोर पुण्याकडे जाणाऱ्या बाजूला बुधवारी (ता. ११) सायंकाळी साडेसहा वाजता घडली आहे. अपघात झालेल्या दोन्ही व्यक्ती या कुर्डूवाडी (ता. माढा, जि. सोलापूर) येथील असल्याची माहिती मिळाली असून पूर्ण नाव व पत्ता याची माहिती अद्याप मिळू शकली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकीवरील दोघेजण हे पुणे - सोलापूर महामार्गावरून पुण्याच्या बाजूने दुचाकीवर निघाले होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून एक रुग्णवाहिका हि निघाली होती. यावेळी रुग्णवाहिकेला रस्ता देताना त्यांना अज्ञात वाहनाची ठोस बसली की त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले याची माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे दोघेजण रस्त्यावर आपटले.

यावेळी पाठीमागून आलेल्या वाहनाखाली दुचाकी चालकाचा हात गेल्याने हाताला मोठी दुखापत झाली. तर पाठीमागे बसलेल्या व्यक्तीला गंभीर दुखापत झाली. यावेळी परिसरातील नागरिकांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती. त्याचवेळी केशर रुग्णवाहिकेचे वैजिनाथ कदम हे त्यांची खाजगी गाडी नीट करून उरुळी कांचन कडे निघाले होते.

कदम यांनी क्षणाचाही विचार न करता त्यांच्या स्वतःच्या खासगी गाडीतून दोघांनाही तात्काळ उरुळी कांचन येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. अपघातग्रस्त व्यक्ती मदतीची अपेक्षा करत असताना कदम यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाचे परिसरात कौतुक केले जात आहे. अपघातातील व्यक्तींची नावे अद्याप समजू शकली नसून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

**५०० मीटरवर चारचाकीची कामगाराला धडक**

सोरतापवाडी हद्दीत महामार्गाच्या बाजूला काम करीत असलेल्या एका कामगाराला एका चारचाकी चालकाने जोरात धडक दिली. या घटनेत काम गार गंभीर जखमी झाला आहे. त्या अपघाताची माहिती अद्याप मिळू शकली नाही.

# पंढरीच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या चंदनउटी पूजेची ऑनलाईन नोंदणी आजपासून

## चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्र प्रारंभापर्यंत पूजेचा कालावधी सुरु



**पंढरपूर, ता. १२ :** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) ते ज्येष्ठ शुद्ध षष्ठी अथवा मृग नक्षत्र प्रारंभ होईपर्यंत श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेची पारंपरिक चंदनउटी पूजा आयोजित करण्यात येत आहे. ग्रीष्म ऋतूमध्ये वाढणाऱ्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मूर्तींना शीतलता लाभावी या परंपरेनुसार सदर पूजा संपन्न केली जाते.

सन २०२६ सालाकरिता चंदनउटी पूजेचा कालावधी १९ मार्च ते .०८ जून २०२६ अंदाजे असा निश्चित करण्यात आला असून, सदर पूजा श्रींच्या पोषाखानंतर दुपारी ४.३० ते ५.१५ या वेळेत करण्यात येणार आहे. या पूजेसाठी भाविकांना घरबसल्या नोंदणी करता यावी यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया शुक्रवारी (ता. १३) सकाळी ११ वाजल्यापासून सुरू करण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. मंदिर समितीची ०३ मार्च, २०२४ रोजी सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व पूजांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आवश्यक संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून भाविकांना मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळाद्वारे पूजेची नोंदणी करता येणार आहे. भाविकांनी https://www.vitthalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावरून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी अनुक्रमे २१ हजार व ९ हजार इतके देणगी मूल्य निश्चित करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणी करताना अडचण आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयामार्फत मार्गदर्शन व नोंदणीस सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर पूजेबाबतची सविस्तर माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी भाविकांनी दूरध्वनी क्र. ०२१८६- २९९२९९ वर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# कुंजीरवाडीत चार चाकीने दिलेल्या धडकेत तरुण गंभीर जखमी; चालक फरार

**लोणी काळभोर, ता. १२ :** पुणेसोलापूर महामार्गावर भरधाव अज्ञात चारचाकी वाहनाने दिलेल्या धडक्ेत एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी येथील तोरणा हॉटेलजवळ बुधवारी (ता. ११) सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. अपघातानंतर चालकाने कोणतीही मदत न करता वाहनासह पळ काढल्याने संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मयुर दादा कोळपे (वय २१, रा. कोळपेवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयुर कोळपे हा आपल्या कुटुंबासह शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतो. तो दररोज सायंकाळी कुंजीरवाडी येथील जिममध्ये व्यायामासाठी जात असतो. १ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता मयुर हा जिमला जाण्यासाठी कुंजीरवाडी येथील तोरणा हॉटेलजवळ आपल्या मामाची वाट पाहत उभा होता. त्याचा मामा संतोष हिरामण लकडे हा मोटारसायकलवरून तेथे येऊन पुणेसोलापूर महामार्गाच्या विरुद्ध बाजूस थांबला.

मयुर हा पायी रस्ता ओलांडत असताना पुण्याकडून सोलापूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्याला जोरदार धडक दिली.या अपघातात मयुर गंभीर जखमी झाला. मात्र वाहनचालकाने अपघातानंतर थांबण्याऐवजी वाहनासह घटनास्थळावरून पलायन केले. जखमी अवस्थेत पडलेल्या मयुरला त्याचा मामा संतोष लकडे यांनी तातडीने रस्त्याच्या कडेला नेऊन खाजगी रुग्णवाहिका बोलावली व विश्वराज हॉस्पिटल मध्ये दाखल केले.

डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मयुरचा डावा पाय गुडघ्याखाली फ्रॅक्चर झाल्याचे निदान केले असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर लोणी काळभोर पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमीचा जबाब नोंदवला. याप्रकरणी अज्ञात चारचाकी वाहन चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम ११९, १३४, १७७ व १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून फरार चालकाचा शोध सुरू असल्याची माहिती देण्यात आली. महामार्गावर वाढत चाललेली बेदरकार वाहनचालकांची संख्या आणि अपघातानंतर मदत न करता पळ काढण्याच्या घटना चिंताजनक ठरत असून नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

## बनावट सोन्याची बिस्कीटे देत फसवणूक

**हडपसर, ता. १२ :** बनावट सोन्याची बिस्कीटे देऊन अस्सल सोन्याची मोड घेत फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक केली आहे. दिलीप विश्वनाथ स्वामी उर्फ जाधव (वय ५२ , रा. जळकोट, जि.लातुर), अमोल बाबू गिरी (वय ३२, रा. अहमदपूर, जि. लातुर) अशी त्यांची नावे असून त्यांच्याकडून १२ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातील दिलीप स्वामी रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्यावर विविध ठाण्यात अपहरण, फसवणूक असे गुन्हे दाखल आहेत. खंडणी विरोधी पथकाचे हवालदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखिले हडपसर ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना स्वामी साथीदारासह साधना विद्यालयाकडे जाणाऱ्या कॅनल रोडवर चोरी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्याला पकडल्यावर २४ जुलै २०२५ ला प्रेमळ विठ्ठल मंदीराजवळ वयस्कर महिलेला बनावट सोने देत अस्सल सोन्याची पोत लांबविली होती.

## प्राईम लाईफ



## कोणती फळे फ्रीजमध्ये ठेवू नयेत हे तुम्हाला माहीत आहे का, जाणून घ्या

केळी हे अशा फळांपैकी एक आहे, जे फ्रीजमध्ये ठेवणे योग्य नाही. केळी फ्रीजमध्ये ठेवल्यास, केळीची साले लवकर काळी पडू लागतात. केळी फ्रीजमध्ये ठेवल्यास केळी नैसर्गिक पिकण्याचे चक्र थांबते. त्यामुळे केळीची चव बिघडते.

आंबा फ्रीजमध्ये ठेवल्याने आंब्याचा गोडवा कमी होऊ शकतो आणि त्याच्या सुगंधावर परिणाम होऊ शकतो.

डाळिंब खोलीच्या तापमानातच ठेवणे केव्हाही उत्तम.

पपई रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्याने ती लवकर घट्ट होऊ शकते. पपईचा नैसर्गिक गोडवा आणि ओलावा फ्रीजमध्ये ठेवल्यास कमी होऊ शकतो. केळी फ्रिजमध्ये ठेवल्यावर ते काळे पडू लागते आणि त्याची पोत देखील बदलतो. काही फळे खोलीच्या तापमानातच ठेवल्यास ती चांगली राहतात. खोलीच्या तापमानामध्ये फळं नैसर्गिकरीत्या पिकतात, त्यामुळे त्यांचे पोषक घटक टिकून राहतात. फळे योग्यपद्धतीने कशी साठवावी यामध्ये काही गोष्टी या लक्षात ठेवायला हव्यात. त्यामुळे फळे ताजीही राहतील आणि त्यांची मूळ चवही अबाधित राहील.

पपई हे एक उष्णकटिबंधीय फळ आहे, म्हणूनच पपई फ्रीजमध्ये ठेवू नये. फ्रीजमध्ये ठेवल्यास पपई पिकण्याची प्रक्रिया थांबते. तसेच पपईच्या नैसर्गिक चवीवर परिणाम होतो. पपई कच्ची असेल तर ती खोलीच्या तापमानाला पिकूद्यावी.

संत्री आणि लिंबू ही फळे त्यांच्या नैसर्गिक जाड सालीमुळे खोलीच्या तपमानावर बराच काळ ताजी राहतात. संत्री किंवा लिंबू रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले तर ते लवकर कडू होतात.

अननस फ्रीजमध्ये ठेवल्याने त्याची चव चांगली लागत नाही.

पेरू- रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्याने त्याचा सुगंध आणि चव कमी होऊ शकते.

पीच आणि प्लम फ्रीजमध्ये ठेवल्यास ही फळे सुरकुत्या पडू शकतात आणि आतून कमी रसदार होऊ शकतात.

फ्रीजमध्ये कोणती फळे ठेवणे चांगले?
सफरचंद, स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, चेरी, कापलेले टरबूज, लिची, द्राक्षे.

# गृहखाते केवळ फोडाफोडीत मग्न, मुंबई सुरक्षित नाही; बॉम्बच्या धमकीवरून राऊत यांचा टोला

**मुंबई, ता. १२ :** राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना विधानभवनाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. धमकीचा मेल आल्यानंतर पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून विधानभवन परिसरामध्ये मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. यावरून आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी गृहखात्यावर बोचरी टीका केली आहे. गृहखाते, पोलीस दल, इंटेलिजेंस हे केवळ राजकीय फोडाफोडीत व्यस्त असल्याची टीका राऊत यांनी गुरुवारी सकाळी दिल्लीत माध्यमांशी बोलताना केली.



महाराष्ट्राच्या विधानभवनात अधिवेशन सुरू असताना बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरली आहे. त्याच्यामुळे त्यांची कानाकोपरा शोधण्याची प्रक्रिया सुरू आहे. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे सक्षम गृहमंत्री असताना विधानभवनात कोण बॉम्ब ठेवण्याचे धाडस करेल. कारण इतका महान गृहमंत्री आम्हाला लाभलेला आहे, असा टोला संजय राऊत यांनी लगावला.

गृहमंत्री म्हणून फडणवीस काय करतात हा संशोधनाचा विषय आहे. आणीबाणीच्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांनी हुकुमशाहीविरुद्ध लढण्यासाठी बॉम्ब बनवले होते. पण आता देशात आणि राज्यात ज्या पद्धतीने हुकुमशाही सुरू आहे आणि विरोधकांना मान वर करूच द्यायची नाही त्यामुळे विरोधक फक्त या गोष्टीचा निषेधच करू शकतात. मात्र अफवा असली तरी तरी विधानभवनात बॉम्ब ठेवल्याची धमकी देणे हे राज्याच्या गृहमंत्र्यांसाठी आव्हान आहे, असे राऊत म्हणाले.

विधान भवनाच्या बाजूला हॉटेल ताजवर २६/११ ला दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. त्यानंत इस्त्रायली इमारत, ट्रायडंट हॉटेलवर हल्ला केला होता. याचा अर्थ मुंबई सुरक्षित नाही, मुंबई भीतीच्या सावटाखाली आहे आणि महाराष्ट्राचे गृहखाते, पोलीस दल, इंटेलिजेंस हे फक्त आपल्या राजकीय विरोधकांमध्ये फोडाफोडी करण्यासाठी, दहशत निर्माण करण्यासाठी वापरले जाते. त्याच्यामुळे गुन्हेगारांचा, दहशतवाद्यांची मानसिकता अशी आहे की इथे आपण काही केले, तर आपल्यापर्यंत पोलिसांचे हात पोहोचणार नाहीत, असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला.

विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना आणि स्वतः गृहमंत्री, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार असताना अशा प्रकारच्या अफवाही पसरू नयेत, कारण आम्ही आमच्या डोळ्यांनी देशाच्या पार्लमेंटवर झालेला हल्ला पाहिला आहे आणि तेव्हाही भाजपचेच सरकार होते, हे दुर्दैवाने सांगावे लागते, असेही राऊत यावेळी म्हणाले.

# आंध्र प्रदेशात भेसळयुक्त दुधामुळे १३ जणांचा मृत्यू

## ११ जणांची प्रकृती चिंताजनक

**आंध्र प्रदेश, ता. १२ :** आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. येथील एका गावात भेसळयुक्त दूध प्यायल्यामुळे तब्बल १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या विषबाधेमुळे आणखी ११ जणांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, २२ फेब्रुवारी रोजी अनेकांना अचानक उलट्या, तीव्र पोटदुखी आणि मूत्रमार्गात अडथळा निर्माण होण्यासारख्या गंभीर आरोग्य समस्या जाणवू लागल्या. या सर्वांनी एकाच दूध पुरवठादाराकडून दूध खरेदी केले असल्याचे तपासात उघड झाले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अन्न सुरक्षा विभागाने तातडीने संबंधित डेअरी युनिटची तपासणी केली आहे. प्रशासनाने तेथील दूध आणि इतर अन्नपदार्थांचे नमुने गोळा करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. या प्रकरणी संबंधित दूध पुरवठादाराला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी केली जात आहे.

# पुण्यातील वाहतूक कोंडीवर आमदार राहुल कुल आक्रमक; रिंगरोड व अतिक्रमणांवर सरकारचे लक्ष वेधले

**दौंड, ता. १२ :** पुणे जिल्ह्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि दळणवळणाच्या समस्यांबाबत आमदार राहुल कुल यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आक्रमक भूमिका घेत राज्य सरकारचे लक्ष वेधले. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सुरू असलेल्या रिंगरोड, इलेव्हेटेड रस्ते आणि बोगदा प्रकल्पांना गती देण्याची तसेच रस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवण्याची त्यांनी आग्रही मागणी केली.

विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी रिंगरोड प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच शहरातील आणि महामार्गांवरील अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना आमदार कुल यांनी पुणे महानगर क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी रिंगरोड आणि उड्डाणपुलांच्या प्रकल्पांना मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकारचे आभार मानले. हे प्रकल्प पुण्याच्या भविष्यातील विकासासाठी महत्त्वाचे ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



यावेळी त्यांनी काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या इनर रिंग रोड प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच खडकवासला ते लोणी काळभोर दरम्यान प्रस्तावित २८ किमी लांबीच्या टनेल प्रकल्पासाठी २२०० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे शहराच्या मध्यभागी शासनाच्या मालकीची सुमारे ३४ किमी मोकळी जागा उपलब्ध होणार असून, तिचा वापर भविष्यातील ट्रॉफिक नियोजनासाठी करण्याची सूचना त्यांनी केली.

याशिवाय पुणे शहराला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग आणि अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्यामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे हायवे प्राधिकरण आणि पुणे महानगरपालिकेने संयुक्त मोहीम राबवून अतिक्रमणे कालबद्ध पद्धतीने हटवावीत, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार कुल यांच्या मागण्यांची दखल घेत राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, रिंगरोड प्रकल्पाच्या एकूण १२ पॅकेजेसपैकी ९ पॅकेजेसचे काम प्रत्यक्ष सुरू झाले आहे. भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या १४.१ हेक्टर जागेसाठी ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, महामार्ग व शहरातील अतिक्रमणे हटवण्यासाठी प्रशासनाला लवकरच निर्देश दिले जाणार आहेत.

दरम्यान, पुणे आणि विशेषतः दौंड मतदारसंघातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी आमदार राहुल कुल सातत्याने पाठपुरावा करत आहेत. सरकारकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादा मुळे पुणेकरांना वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुंबईतील विधानभवन इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**मुंबई, ता. १२ :** मुंबईतील विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाली असल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच अशा प्रकारची धमकी प्राप्त झाल्यामुळे एकच खळबळ उडाली. यानंतर पोलिसांनी तात्काळ विधानभवनाच्या इमारतीचा ताबा घेत तपासणी केली. बॉम्ब शोधक आणि श्वान पथकाद्वारे इमारतीची पाहणी केली. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. तसेच विधानभवनासह आणखी चार महत्त्वाच्या ठिकाणांसाठीही धमकी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.



सुरक्षा दल पाहणी करत असताना इमारतीमधील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना बाहेर काढण्यात आले होते, अशी माहिती मिळत आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सकाळी माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांना याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी सदर धमकी खोटी असल्याची माहिती दिली गेल्याचे सांगितले.

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी याबद्दल माध्यमांशी संवाद साधत संपूर्ण माहिती दिली. आज सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी मुंबई आयुक्तांच्या ईमेलवर धमकी प्राप्त झाली होती. विधानभवन बॉम्ब किंवा क्षेपणास्त्राने उडवून देण्याचा त्यात उल्लेख होता. धमकी मिळाल्यानंतर बॉम्ब शोधक पथकाकडून विधानभवन इमारतीची सखोल तपासणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणेने आवश्यक ती दखल घेतली आहे, अशी माहिती राम शिंदे यांनी दिली.

दरम्यान ही धमकी कुणी दिली, याची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही, असेही राम शिंदे म्हणाले. संवेदनशील ठिकाणांबाबत सदर धमकी मिळाली असल्यामुळे पूर्ण तपासानंतरच त्याची माहिती देऊ, असे त्यांनी सांगितले.

**कामकाज सुरू राहणार**

अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्यामुळे आज सकाळपासूनच दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरू होणार होते. त्याची तयारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी केली आहे. बॉम्ब शोधक पथकाने तपासणी केल्यानंतर आम्ही विधानभवनात प्रवेश केला असून लवकरच कामकाज सुरू करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

# लोणी स्टेशन येथील अपघातात जखमी झालेल्या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू

**लोणी काळभोर, ता. १२ :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग ओलांडताना एका कामगाराला अज्ञात वाहनाने धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी स्टेशन (ता. हवेली) परिसरातील प्यासा हॉटेलसमोर २७ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली आहे . या अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून चालकाचा शोध सुरू आहे.

गणेश छगन अल्हाट (रा. लोणी काळभोर) यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. याप्रकरणी अभिषेक राजेंद्र क्षिरसागर (वय २२, व्यवसाय सेल्समेन, रा. कदमवाकवस्ती, लोणी काळभोर) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात वाहनावरील अनोळखी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अभिषेक क्षिरसागर ही २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी कामावर गेले होते. त्यानंतर त्यांचे मामा गणेश अल्हाट हेही सकाळी सेंट्रींगच्या कामासाठी घराबाहेर पडले.

मात्र रात्री उशिरापर्यंत ते घरी परतले नाहीत. कामाच्या कारणाने ते कधी कधी दोन दिवस बाहेर राहत असल्याने कुटुंबीयांनी त्याकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, १ मार्च रोजी सायंकाळी फिर्यादीची आजी सिंधू रणदिवे या भाजी आणण्यासाठी प्यासा हॉटेल परिसरात गेल्या असता, ओळखीच्या महिलेने २७ फेब्रुवारी रोजी त्या ठिकाणी गणेश अल्हाट यांचा अपघात झाल्याची माहिती दिली. ही बाब समजताच कुटुंबीयांमध्ये एकच खळबळ उडाली.

त्यानंतर अभिषेक क्षिरसागर यांनी विश्वराज हॉस्पिटल येथे चौकशी केली असता, गणेश अल्हाट यांना गंभीर जखमी अवस्थेत तेथून पुढील उपचारासाठी ससून रुग्णालयात हलविण्यात आल्याचे समजले. ससून रुग्णालयात ते आयसीयू वॉर्ड क्रमांक ७ मध्ये दाखल होते. अपघातात त्यांच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर, पाठीच्या मणक्याला गंभीर दुखापत तसेच डोक्याला मार लागल्याचे डॉक्टरांनी सांगितले. काही दिवस उपचार सुरू असतानाच ४ मार्च रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर ससून रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. पुणे रेल्वे स्थानकाजवळील कैलास स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पूर्व हवेलीत विद्युत रोहित्र चोरणारी टोळी जेरबंद; अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

## गुन्हे शाखेच्या युनिट-७ ची कामगिरी

**लोणी काळभोर, ता. १२ :** परिसरात वीज ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याच्या तारांची चोरी करणाऱ्या टोळीचा अखेर पुणे शहर गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट-७ पथकाने सापळा रचत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून तांब्याच्या तारांनी भरलेली पोती आणि टेम्पो असा तब्बल ११ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे लोणी काळभोर, लोणीकंद आणि वाघोली पोलीस ठाण्यात दाखल एकूण ६ गुन्ह्यांची उकल झाली आहे.

नुरहसन खलील खान (वय २७, रा. एकनाथ पठारे वस्ती, चंदननगर, पुणे, मूळ उत्तर प्रदेश) आणि भैय्याराम पट्टे यादव (वय २२, रा. दिवेगाव, ता. पुरंदर, जि. पुणे, मूळ उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणीकंद, लोणी काळभोर आणि वाघोली परिसरात वीज वितरणासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याच्या तारांची चोरी वारंवार होत होती. या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या युनिट-७ पथकाने विशेष पाळत ठेवली होती. गस्तीदरम्यान पोलीस अंमलदार ऋषिकेश ताकवणे यांना गोपनीय माहिती मिळाली की, चोरी केलेल्या तांब्याच्या तारांसह आरोपी MH-४७ Y ०६७६ क्रमांकाच्या पांढऱ्या टेम्पोमधून थेऊरहून कोलवडीकडे जाणार आहेत.



ही माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी केसनंद-थेऊर रोडवरील कोलवडी पुलाजवळ सापळा रचला. काही वेळात संशयित टेम्पो तेथे आल्यानंतर पोलिसांनी वाहन थांबवून झडती घेतली. तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये तांब्याच्या तारांनी भरलेली ९ पोती आढळून आली. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी साथीदारांच्या मदतीने लोणी काळभोर, लोणीकंद व आसपासच्या भागातील ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याच्या तारांची चोरी केल्याची कबुली दिली.

दरम्यान, ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याच्या तारांची चोरी झाल्यास परिसरातील वीजपुरवठा खंडित होण्याचा मोठा धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा चोरीमुळे केवळ लाखो रुपयांचे नुकसान होत नाही, तर नागरिकांनाही अंधार आणि अडचणींचा सामना करावा लागतो. परंतु, पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात ट्रान्सफॉर्मर फोडून तांबे चोरी करणाऱ्या टोळीला मोठा आळा बसल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मदन कांबळे तसेच पोलीस कर्मचारी सारंग दळे, ऋषिकेश ताकवणे, प्रशांत कापुरे, निलेश साळवे, निर्णय लांडे, विनायक साळवे, नेहा तापकीर, नितीन धाडगे, बाळासाहेब तनपुरे, महिला पोलीस कर्मचारी प्रतिक्षा पानसरे आणि कीर्ती मांदळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.